लोकमत

# जि.प. कर्मचारी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवात हिंगणाचे बल्ले-बल्ले!

## ११ शिल्डस पटकावले : खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**गुमगाव :** नागपूर जिल्हा परिषदेच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी तसेच त्यांच्यातील सांघिक भावना निर्माण होऊन ताणतणाव कमी करण्याच्या उद्देशाने नागपूर येथील पोलिस मुख्यालय क्रीडांगणावर अधिकारी व कर्मचारी यांचा क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात हिंगणा पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. यात हिंगण्याच्या खेळाडूंनी तब्बल ११ शिल्ड्स प्राप्त करून पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध केले.

जिल्हा परिषदेच्या कै. आबासाहेब खेडकर सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात मुख्य कार्यपालन अधिकारी विनायक महामुनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रोहिणी कुंभार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिद्धेश्वर काळुसे, आदी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवात हिंगणा पंचायत समितीने महिला समूह नृत्य यात प्रथम क्रमांक पटकाविला.



महिलांच्या १०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक आशा करणाके यांनी मिळविला. रांगोळी स्पर्धेतील द्वितीय पारितोषिकाच्या मानकरी शीतल पराडकर ठरल्या. लांब उडीतील तृतीय क्रमांकाचे बक्षीस आशा करणाके, महिला गोळाफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक आशा करणाके यांनीच पटकाविला.

**पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत धर्मराज रोकडे यांनी द्वितीय, तर अवधेश तिवारी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. क्रिकेट स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून राहुल इखार याला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिला समूह गायन स्पर्धेत द्वितीय तसेच पुरुष समूह गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले.**

**१००**
**मीटरच्या दौड स्पर्धेत आशा करणाके अव्वल**

महिला वेशभूषा स्पर्धेत सविता वागदे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. हिंगणा पंचायत समितीतील अधिकारी तथा कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद नागपूर क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात देदीप्यमान कामगिरी बजावल्याबद्दल हिंगणा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप गोडशलवार, ज्योत्स्ना हरडे, चंद्रभान शोभणे, राजकुमार पचारे, अधीक्षक नरेश इटनकर, संपदा रिणके, सुशांत गादेवार, सहायक गटविकास अधिकारी रवी राठोड, विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी ओ. के. मेश्राम, प्रकाश भारद्वाज, विद्या डोये, प्रशांत महल्ले, सचिन श्रीरामे, विविध विभाग प्रमुख तसेच संबंधित केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर आपतुरकर, भूपेश चव्हाण, लीलाधर चरपे, संघपाल शंभरकर, विजय किरपाल, एकनाथ ढोरे, संध्या येळणे, माया शेंडे यांनी विजेता खेळाडूंचे व समोरच्या चमूंचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

बीडचा
लोकनायक
भारत गायकवाड
23 Feb 2025 - Page 3 | www.loknayak.in
Powered by softisky | 9764331134

# जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सावनेर पंचायत समितीनी मारली बाजी

विनोद गोडबोले नागपूर

नागपूर दिनांक १८ फरवरी ते २० फरवरी २०२५ ला जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये जिल्ह्यातील तेराही पंचायत समितीचे कर्मचारी अधिकारी शिक्षक ग्रामसेवक आरोग्य वर्कर इत्यादी कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होता सदर क्रीडा पोलीस लाईन टाकळी येथील पोलीस मैदानावर झाल्या त्यामध्ये सावनेर तालुक्यातील १६० गुण घेऊन चॅम्पियनशिप प्राप्त केली पुरुषांचे रस्सीखेच महिलांची रस-सीखेच,या मध्ये विजेता,महिला हॉलिबाल यामध्ये सिल्वर मेडल प्राप्त झाले
मैदानी तसेच इंडोर गेम तसेच सांस्कृतिक मध्ये १८ मेडल प्राप्त केले सांघिक व वैयक्तिक स्पर्धा एकूण २१ पदक प्राप्त केलेत बक्षीस वितरण खेडकर सभागृह जिल्हा परिषद येथे पार पडला कार्यक्रमाच्या

अध्यक्ष मा.श्री विनायक महामुनी,मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचे हस्ते सर्व खेळाडूंना मेडल पदक वितरण करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत माननीय श्री विपुल जाधव उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन तसेच सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हजर होते



१६० गुण घेऊन पंचायत समिति सावनेर अग्रस्थानी, १०६ गुण घेऊन पंचायत समिति कुही द्वितीय स्थानी तर नागपूर मुख्यालयाला ८३ गुण घेऊन तृतीय स्थानावर राहावे लागले

# जि.प.च्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सावनेर चमकले

## ■ सावनेर पंचायत समितीने २१ बक्षिसांवर कोरले नाव



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**नागपूर : जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांतील कलागुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी जि.प.च्या वतीने क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या स्पर्धांना भक्कम प्रतिसाद मिळाला. सावनेर पंचायत समितीने या स्पर्धात २१ बक्षिसे प्राप्त करून आपले नाव कोरले.**

जि.प.च्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा पोलीस लाइन टाकळी मैदानावर, तर सांस्कृतिक स्पर्धा इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर येथे पार पडल्यात. यामध्ये सावनेर तालुक्यातील संघाने विविध एकल आणि सांघिक स्पर्धेत उत्तम कामगिरी केली. सांघिक खेळातील रस्सीखेच (पुरुष)मध्ये प्रथम, महिलांच्या गटात प्रथम, समूहगीत गायन (पुरुष) प्रथम, व्हॉलीबॉल (महिला) द्वितीय, बॅडमिंटन डबल्समध्ये द्वितीय पारितोषिक पटकाविले. पुरुषांच्या मॅरेथॉनमध्ये गौरीशंकर मुंडले यांनी प्रथम, १०० मीटरमध्ये पूनम मडावी, रांगोळीमध्ये जया धोटे, लांब उडीमध्ये कविता बोंद्रे, गोळाफेकमध्ये पूनम मडावी, गोळाफेक (महिला)मध्ये उज्ज्वला मेश्राम व कॅरममध्ये डॉ. रूपाली हणवते यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. महिलांच्या मॅरेथॉनमध्ये पूनम मडावी, ४०० मीटर दौडमध्ये कविता बोंद्रे, गोळाफेक (पु.) प्रणव डवरे, एकल गायनात सुजाता गिरडे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. १०० मीटर दौडमध्ये गौरीशंकर मुंडले, मॅरेथॉन व १०० मीटर दौडमध्ये कविता बोंद्रे यांनी तृतीय स्थान पटकाविले. उत्कृष्ट स्पॅशर पुरस्काराने डॉ. चेतना उमाठे आणि उत्कृष्ट लिफ्टर पुरस्काराने योगिता बावनकर यांचा गौरव करण्यात आला. उल्लेखनीय कामगिरीसाठी सावनेर पंचायत समितीच्या महिला समूहनृत्य, पुरुष समूहनृत्य, कबड्डी (पुरुष), महिला समूहगीत व पुरुष व्हॉलीबॉल आणि क्रिकेट संघाचा गौरव करण्यात आला. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये यावर्षी सावनेरने अव्वल स्थान मिळविले. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर, कक्ष अधिकारी महेश राऊत, गटशिक्षणाधिकारी कश्यप सावरकर, मोहनीश शेलवटे व राहुल तिवारी यांनी मार्गदर्शन केले, अशी माहिती आशुतोष चौधरी व दीपक शेंडे यांनी दिली.